# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - आयुष्य नि गाणे
- कवी / कवयित्रीचे नाव :- माधव कणसे

---

आयुष्य वाटते, अविरत गाणे
पाया, दोघांचाही षड्जात
सूरही सगळे, त्या सभोवती
गाणे जगणे, फिरते त्यात

'सा' लागता, छान तंबोऱ्यावर
सूर खुलवती, राग अविष्कार
जगण्यात होतो तो 'स्वभाव'
करतो आयुष्याचे गाणे सुंदर

पक्ष्यांची गाणी का सुरात
जपती ते, ताल लयीला
निसर्गही सांभाळत तो मेळ
हुंकार देतो, अनहत गाण्याला

चालू असतो, रियाज यांचा
जगतात ते, गात गात
आनंद वाटण्याचे त्यांचे वाण
कधी न होई, ते खंडित

Anahat Music Therapy